# त्यांनीच तर मला 'आत्मसन्मानाची' जाणीव दिली.'

द टाईम्स ऑफ इंडिया, पूणे, बुधवार,३ डिसेंबर २००८

अरविंद गुप्ता
अनुवाद –प्रकाश गोपाळ बोकील



मिसेस फ्रे (उजवीकडे) आणि त्यांचे कुटुंबिय

माझे आईवडील शाळेत कधीच गेले नाहीत. त्या अर्थाने ते तसे अशिक्षितच, पण आपल्या मुलाबाळांना सर्वोत्तम शाळेतलं शिक्षण मिळावं या विषयी मात्र ते खूपच जागरूक होते. विशेषतः माझी आई तर त्या दिशेनं प्रत्यक्षात कार्यरतही होती. म्हणूनच तर उत्तर प्रदेशातील 'बरेली'ला तिनं मला आवर्जुन पाठवलं होतं, त्या काळातल्या तिथल्या एका सर्वोत्कृष्ट शाळेत शिकण्यासाठी. त्या शाळेचं नाव होतं, सेंट मारिया गोरेट्टी कॉनव्हेंट स्कूल. या शाळेत मुलं आणि मुली एकत्र शिकत होते. इथल्या सर्वच शिक्षिका अत्यंत सेवाभावी होत्या, धडपडया होत्या. माझ्यावर्गात त्यावेळी नऊ मुली आणि तीन मुले होती. या एकूण बारा

विदयार्थ्यांपैकी तिघाजणांनी ‘प्रगत अंकगणित’ हा विषय सिनिअर केंब्रिजच्या परिक्षेसाठी घेतला होता आणि मला सांगायला खूप अभिमान वाटतोय की त्या तिघांपैकी मी पण एक होतो!

शाळेत मिसेस फ्रे नावाच्या एक शिक्षिका आम्हाला गणित हा विषय शिकवीत असत. काय गंमत आहे बघा, अदयापही मला त्यांचे पहिले नाव माहित नाहीये! ‘फ्रे मॅडम’ या नावानेच आम्ही त्यांना ओळखत असू. आम्ही तिघे गणिताचे विदयार्थी, आणि फ्रे मॅडम एकत्रितपणे एका टेबलाभोवती बसून चर्चा करीत करीत, कृती करीत करीत शिकत असू. खरे तर गणितात त्या अत्यंत हुशार! पण तरीही अगदी पहिल्याच दिवशी त्यांनी आम्हाला सांगितलं होतं; “हे बघा मुलांनो,मला गणितातलं तसं काही फारसं समजत नाही; तेव्हा गणिताबाबत तुम्ही माझ्याकडून फारशा काही अपेक्षा ठेवू नका. बरंचसं काम तुमचं तुम्हालाच करावं लागणार आहे. शिवाय तुम्ही हुशार आहातच; तेव्हा एकमेकांची मदत घ्या अन् सुरू करा.”

विदयार्थ्यांना प्रेरणा देण्याची आणि त्यांना कामाला लावायची किती छान पध्दत! मॅडमना हे ही छान माहीत होतं की, गणितात मला चांगली गती आहे पण इंग्रजीत मात्र मी थोडासा मागे पडतोय. मग त्यांनी काय करावं? त्या माझ्याशी सतत इंग्रजीतून बोलू लागल्या; अगदी तासन् तास. इतकेच नव्हे तर इंग्रजी भाषेतलं साहित्य मी जास्तीत जास्त वाचावं यासाठी त्या मला सतत प्रोत्साहन देत असत. त्या मला पुन्हा पुन्हा म्हणायच्या; “अरविंद, माझा तुझ्यावर विश्वास आहे. तू हे नक्की करू शकशील. तुला ते जमेल.” आणि काय आश्चर्य; त्यांच्या या प्रेरणेमुळे मी इंग्रजीत उत्तम मार्क्स मिळवून उत्तीर्ण झालो.

आज इतकी वर्षं उलटली, पण ‘एक सर्वोत्तम् शिक्षिका’ म्हणून मिसेस फ्रे यांचेच नाव आजही सर्वप्रथम माझ्या मनात डोकावते. आपलं काम अत्यंत प्रामाणिकपणानं करण्याचं धैर्य त्यांच्याकडे खचितच होतं. का बरं? कारण..कारण त्यांनीच तर मला जीवनाभिमुख शिक्षणाचे धडे दिले, अगदी सातत्याने. आपलं घर, शाळा, परिसर, परिसरात घडणाऱ्या घटना या साऱ्यांचा संबंध प्रत्यक्ष जीवनाशी जोडण्याचं त्यांचं कसब तर केवळ अवर्णनीयच होतं. एकदा काय झालं....

एकदा आम्ही सहा पृष्ठभागांच्या सहाय्याने करायच्या घनाकृती बनविण्याचे काम करीत होतो. त्यासाठी कागदावर निरनिराळया रचना करून पहात होतो. या

रचनांना नेट (NET) असे म्हणतात. एकच घनाकृती करायला अनेक प्रकारच्या नेटस्‌चा उपयोग करता येतो हे आम्हाला समजायला लागलं होतं. थोडया वेळानं आमच्या असंही लक्षात आलं की, आम्ही भरपूर म्हणजे अगदी ३०/३५ रचना करू शकतो. एवढं झाल्यावर मग फ्रे मॅडमनी आम्हाला विचारलं; "आता घन (Cube) तयार करण्यासाठी यातली कोणकोणती नेटवर्कस्‌ वापरता येणं शक्य आहे?" झालं; पुन्हा एकदा आम्ही कामाला लागलो. आता आम्ही प्रत्यक्षात आकृत्या काढणं, त्या योग्य प्रकारे कापणं, नंतर त्या त्या कटींग्जवर घडया घालणं या गोष्टी करायला सुरूवात केली. आता एकीकडे आमच्या डोक्याला खादय मिळालं होतं आणि त्याचवेळी आमच्या हातांनाही काम मिळालं होतं. फारच रमून गेलो होतो आम्ही त्यात. खूप मजा वाटत होती. शिवाय त्यातून बरंच काही शिकणंही घडत होतं; अगदी आपोआप; ते ही हसत खेळत; आनंददायी पध्दतीनं. मला आत्तासुध्दा अगदी स्पष्टपणानं आठवतंय की,त्याच काळात माझ्या रसायनशास्त्राच्या शिक्षिका मात्र केवळ घोकंपट्‌टीवरच भर देत होत्या; निरर्थक, कंटाळवाणी घोकंपट्‌टी. खरंच, किती ग्रेट होत्या आमच्या त्या गणिताच्या मॅडम! फ्रे मॅडम!! त्यांनीच तर आम्हाला नुसत्या गणिताऐवजी 'प्रयोग' करायला, 'कृती' करायला शिकवलं.

मिसेस फ्रे यांना एक मुलगा होता. त्याचं नाव डेव्हिड. तो नैनितालच्या विख्यात 'शेरवूड' स्कूलमध्ये शिकत होता. मी आणि डेव्हिड, तसे आम्ही दोघे समवयस्कच होतो. त्यावेळी माझी फायनल सिनिअर केंब्रिजची परिक्षा अगदी तोंडावर आली होती. एके दिवशी फ्रे मॅडम आमच्या घरी आल्या; अगदी अचानकच. त्यांच्या बरोबर डेव्हिडही होता. खरे तर आमच्या घरापर्यंत पोहोचणं तसं सोपं नव्हतं. अनेक छोटे मोठे रस्ते, अरूंद गल्ल्या यांचं जाळं ओलांडूनच घरापर्यंत यावं लागे. त्यातून पहिल्यांदाच त्या आमच्या घरी आल्या होत्या. म्हणूनच त्या कशाकाय त्या जंजाळातून आमच्या घरी पोहोचल्या हे खरं तर मला आजपर्यंत न उलगडलेलं कोडंच आहे! माझी बहीण सुध्दा मिसेस फ्रे यांची पूर्वीची विदयार्थिनी होती. तिनं आणि मी जेव्हा आमच्या घराच्या दारात फ्रे मॅडमना पाहिलं तेव्हा आम्हां दोघांनाही खूप आनंद झाला; खूप म्हणजे अगदी प्रचंडच! आम्ही अगदी मनापासून त्यांचं स्वागत केलं. आत येताच मॅडमनी सांगून टाकलं; "अरविंद, डेव्हिडला गणितातले काही प्रश्न सुटत नाहीयेत. तेव्हा मी ठरवलं की, त्याला आपल्या सर्वोत्तम, कुशाग्र अशा दोन विदयार्थ्यांकडे घेऊन जावं; म्हणूनच अरविंद मी आत्ता तुझ्याकडे आले आहे." कल्पना करा, मॅडमचं हे बोलणं ऐकून काय वाटलं असेल आम्हाला? त्या

क्षणी मी आणि माझी बहीण, आम्ही दोघंही जणू जगातल्या सर्वोच्च सिंहासनावर आरूढ झालो होतो!

तुम्हाला खरंच सांगतो, माझ्या आईप्रमाणेच माझ्या या गणिताच्या शिक्षिकेनं, फ्रे मॅडमनी, मला माझ्या आत्मसन्मानाची जाणीव करून दिली होती. 'आपण जीवनात काहीतरी सर्वोत्तम करू शकतो' याचं बीज त्यांनी माझ्या मनात पेरलं होतं. त्या 'स्व' च्या जाणीवेमुळेच तर आयआयटीची–मोठया सन्मानाची डिग्री –माझ्याकडे असूनही मी मात्र अगदी वेगळा जीवनमार्ग स्वीकारला. तुमचा विश्वास बसणार नाही, पण खरंच गेली ३० वर्षे मी सातत्याने एकच काम करीत आलोय अन् ते म्हणजे माझ्या देशातल्या जास्तीत जास्त विदयार्थ्यांना शाळेतला त्यांचा विज्ञान हा विषय मनोरंजक कसा वाटेल, प्रत्यक्ष अनुभव घेऊन ती हा विषय कसा शिकतील, यासाठी प्रयत्न करीत रहायचे. हे करताना खर्च झालेला माझ्या आयुष्यातील प्रत्येक मिनिट मला आवडतो. हे घडू शकलं ते केवळ फ्रे मॅडमनी दिलेल्या प्रेरणेमुळेच. "थँक्यू फ्रे मॅडम,तुम्हीच तर मला माझ्यातल्या क्षमतांवर विश्वास ठेवण्याचं बळ दिलंत. माझ्यातल्या 'स्व' ची जाणीव करून दिलीत. थँक्यू वन्स अगेन"